# राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांवर पाणी हक्कदारी कार्यक्रम राबविण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन (वर्ष २०१३-१४)

## १.० पार्श्वभूमी

वर्ष २००५ मध्ये महाराष्ट्र शासनाने जलक्षेत्रातील सुधारणांचा भाग म्हणून खालील २ महत्वपूर्ण अधिनियम पारित केले -

१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम - २००५ (MWRRA Act)

२) महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम-२००५ (MMISF Act)

MWRRA Act मध्ये पाण्याची हक्कदारी (Water Entitlement) म्हणजे त्या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता 'पाण्याचा वापर करण्यासाठी एखादया नदीखोरे अभिकरणाने दिलेले प्राधिकार पत्र' अशी व्याख्या केली आहे. MMISF Act मध्ये सिंचनासाठी पाणी हक्कदारीच्या विशिष्ट व्याख्या करण्यात आलेल्या आहेत त्या अशा -

१) विहित पाणी वापर हक्कदारी (Prescribed Water Use Entitlement)

२) मंजुर पाणी वापर हक्कदारी (Sanctioned Water Use Entitlement)

३) अनुज्ञेय पाणी वापर हक्कदारी (Applicable Water Use Entitlement).

सारांश, जेथे जलाशय व कालवा प्रणाली अस्तित्वात असेल तेथे एखाद्या पाणी वापर संस्थेला खरीप, रबी आणि उन्हाळी हंगामात सिंचनासाठी द्यावयाची पाण्याच्या हक्कदारी लागवडी योग्य क्षेत्राच्या प्रति हेक्टर अशा एककात परिगणित करण्यात येते. बिगर सिंचन वापरासाठी दिलेल्या पूर्व मंजुऱ्या, प्रणालीतून होणारे सर्व प्रकारचे व्यय, प्रणालीमध्ये पाण्याच्या परिमाणात भर टाकणारे घटक आणि प्रकल्पाचे लागवडी योग्य क्षेत्र या साठी विचारात घेतले जातात. मंजुर पाणी हक्कदारी संकल्पन वर्षाच्या (सर्वसाधारण वर्ष) १५ ऑक्टोबर (कोकण व विदर्भ प्रदेशासाठी १५ नोव्हेंबर) रोजी जलाशयात उपलब्ध असलेल्या पाणी साठयावर आधारलेली असते तर अनुज्ञेय हक्कदारी ही त्या दिवशी त्या वर्षी जलाशयात उपलब्ध असलेल्या **प्रत्यक्ष साठयानुसार** बदलते.

## २.० राज्यामध्ये पाणी हक्कदारी कार्यक्रमाच्याअंमलबजावणीची रुपरेषा

पाणी हक्कदारी ही संकल्पना पूर्ण देशभरात सर्वात आधी महाराष्ट्रात राबविण्यास सुरवात झाली. लाभधारकांच्या पाणी वापर संस्थांची पाणी वापर हक्कदारी कायद्याने मान्य करणारे महाराष्ट्र देशातील पहिलेच राज्य आहे.

MWRRA Act च्या कलम ११ (छ) नुसार पाण्याची हक्कदारी, ती देण्याचे निकष निश्चित करणे आणि हक्कदारीचे संनियंत्रण करणे या बाबी प्राधिकरणाच्या कक्षेत येतात. अधिनियम कलम ११ (ण) नुसार 'प्रमाण व प्रकार या दोन्ही दृष्टींनी केलेला पाण्याचा प्रत्यक्ष वापर हा संबंधित नदीखोरे अभिकरणाने वापरावयाच्या विविध प्रवर्गांना दिलेल्या पाणी वापराच्या हक्काला अनुसरुन असल्याचे निश्चित करण्याच्या दृष्टीने मोजमाप व संनियंत्रण या मार्फत, पाणी वापर हक्कदारीची अंमलबजावणी करणारी यंत्रण प्रस्तावित करणे व तिचे नियमन करणे' हे कर्तव्य प्राधिकरणावर सोपविलेले आहे.

## ३.० राज्यामध्ये पाणी हक्कदारी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती

प्राधिकरणाने राज्यातील निवडक पाटबंधारे प्रकल्पांवर वर्ष २००६-०७ पासून पाणी हक्कदारी कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु केली. वर्ष २०१२-१३ पर्यंत या कार्यक्रमाखाली घेतलेल्या प्रकल्पांची व लाभान्वित पाणी वापर संस्थांची संख्या खालील तक्त्यात दर्शविली आहे -

| वर्ष | प्रकल्प | एकूण प्रकल्प | पाणी वापर संस्था | एकूण पा.वा.सं. |
|---|---|---|---|---|
| २००६-०७ | ५ | ५ | ३० | ३० |
| २००७-०८ | ५+१५ | २० | ३०+५१ | ८१ |
| २००८-०९ | ५+१५+५७ | ७७ | ३०+५१+७२ | १५३ |
| २००९-१० | ५+१५+५७+५२ | १२९ | ३०+५१+७२+५९ | २१२ |
| २०१०-११ | ५+१५+५७+५२+१०० | २२९ | ३०+५१+७२+५९+३१५ | ५२७ |
| २०११-१२ | ५+१५+५७+५२+१००+१७ | २४६ | ३०+५१+७२+५९+३१५+२९१ | ८१८ |
| २०१२-१३ | ५+१५+५७+५२+१००+१७+५ | २५१ | ३०+५१+७२+५९+३१५+२९१+२४१ | १०५९ |

वरील प्रकल्पांमध्ये महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत (मजसुप्र) चे २२७ प्रकल्प समाविष्ट असून त्यावरील पाणी वापर संस्थांची संख्या १०३३ आहे. मजसुप्र अंतर्गत सर्वच्या सर्व म्हणजे २३६ प्रकल्प कार्यक्रमात अंतर्भूत असून त्याद्वारे एकूण १५१४ पाणी वापर संस्थांचा समावेश कार्यक्रमात नियोजित आहे. त्याची पूर्तता २०१३-१४ या वर्षाअखेर करण्याचे नियोजन

आहे. कार्यक्रमामध्ये मजसुप्र बाहय असलेले २४ प्रकल्प अंतर्भूत असून त्यावरील २२० पाणी वापर संस्थांपैकी २६ संस्थांचा समावेश कार्यक्रमात आधीच झालेला आहे. या क्षेत्रातील पूर्वानुभवाच्या अभावी टप्प्याटप्प्याने पथदर्शक प्रकल्पांवर हा कार्यक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले. दरवर्षी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींचा आढावा घेऊन त्यात आवश्यक सुधारणा करीत हा कार्यक्रम २०१३-१४ पर्यंत पूर्णत्वास नेण्यात येत आहे.

## ४.० पाणी हक्कदारी कार्यशाळांच्या आयोजनाचा हेतु

क्षेत्रीय स्तरावर कार्यक्रमाची अंमलबजावणी जलसंपदा विभागाकडून होते तर त्याचे संनियंत्रण प्राधिकरणाकडून होते. पाणी वापर संस्थांचे प्रतिनिधी, प्राधिकरणातर्फे थेट नियुक्त केलेले विनियामक, क्षेत्रीय अधिकारी आणि पाणी वापर संस्थांच्या क्षमता बांधणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या सहाय्यकारी (facilitator) सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी यांना हक्कदारीच्या संबंधाने त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या समजाऊन सांगण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई व वाल्मी, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक प्रादेशिक विभागात दरवर्षी रबी हंगामाच्या प्रारंभापूर्वी एक-एक ठिकाणी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात.

कार्यशाळा आयोजनामध्ये वाल्मीचा सहभाग घेण्याचे कारण सिंचन व्यवस्थापन व पाणी वापर संस्थांना सिंचन प्रणालीचे हस्तांतरण या क्षेत्रामधील प्रशिक्षणाच्या बाबतीत वाल्मी, औरंगाबादची कामगिरी देशभरात अग्रगण्य समजली जाते. क्षेत्रीय अधिकारी तसेच पाणी वापर संस्थांचे प्रतिनिधी यांना विविध स्तरानुसार आणि विविध विषयावरील प्रशिक्षणाचे कार्यक्रम परिणामकारकतेने राबवविण्यामध्ये वाल्मीचा हातखंडा आहे. वाल्मीमध्ये या कामासाठी तज्ञ प्राध्यापक व अनुभव गाठीशी आहेत. पाणी वापर संस्थांची क्षमता बांधणी, सबलीकरण, दैनंदिन व्यवहार पार पाडण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन, कृषी विकासाच्या अनुषंगाने उद्‌बोधन याबाबतीत वाल्मीने आतापर्यंत मोठी कामगिरी बजावली आहे.

कार्यशाळा आयोजन करण्यामागील हेतु हा आहे की, पाणी हक्कदारी कार्यक्रम राबविण्यासाठी कार्यरत असलेले क्षेत्रीय अधिकारी, पाणी वापर संस्थांचे सदस्य व विनियामक यांच्यामध्ये विचारांची देवाणघेवाण व्हावी. चांगले काम करणा-या तसेच पुरस्कार प्राप्त पाणी वापर संस्थांच्या कामाच्या पध्दती, त्यांना आलेल्या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी त्यांनी केलेले

प्रयत्न याचा अन्य पाणी वापर संस्थांना मार्गदर्शक व प्रेरक म्हणून उपयोग होईल. त्यायोगे त्यांची कार्यक्षमता, आवाका वाढून **लाभधारकांच्या पाणी वापर संस्थांना सिंचन व्यवस्थापनाचे हस्तांतरण** ही चळवळ जोर धरील. शासनाचे अंगीकृत धोरण व शेतकरी कायद्याचा पारित करण्याचा उद्देश सफल होण्यास हातभार लागेल. प्राधिकरण अधिनियम, ११(थ) अन्वये अपेक्षित असलेली पाणी वापराची कार्यक्षमता साध्य होणे शक्य होईल.

वर्ष २०१३-१४ या वर्षासाठी आयोजित केलेल्या कार्यशाळांची ठिकाणे व उपस्थिती याचा तपशील खालील तक्त्यात दर्शविला आहे -

| प्रदेश | ठिकाण | दिनांक | उपस्थिती | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अधिकारी | विनियामक | पावासंचे प्रतिनिधी | | एकूण |
| | | | | | पुरुष | महिला | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| मराठवाडा | नांदेड | २३/९/१३ | ४३ | १७ | १८ | ६ | **८४** |
| पुणे | कोल्हापूर | ३०/९/१३ | ४७ | ३४ | १९ | २ | **१०२** |
| उत्तर महाराष्ट्र | जळगाव | ३/१०/१३ | १४४ | ८ | ९८ | १ | **२५१** |
| नागपूर | भंडारा | १५/१०/१३ | ९ | २९ | १०२ | १ | **१४१** |
| अमरावती | शेगाव | २५/१०/१३ | १०७ | २९ | ७७ | १ | **२१४** |
| कोकण | सावंतवाडी | २९/११/१३ | ६० | ०६ | ५४ | २८ | **१४८** |
| **एकूण** | | | **४१०** | **१२३** | **३६८** | **३९** | **९४०** |

महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत असलेल्या प्रकल्पांवर पाणी वापर संस्थांच्या क्षमता बांधणीच्या कामासाठी कार्यरत असलेल्या सहाय्यकारी सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी यांची उपस्थिती कार्यशाळेत जवळजवळ नव्हती.

## ५.० पाणी हक्कदारी कार्यक्रम राबविण्यासाठी सिध्दता

पाणी वापर संस्थांना घनमापन पध्दतीने लघु वितरिकेच्या मुखाशी पाणी मोजून दिल्यानंतर लाभधारकांना त्याचे समन्यायी पध्दतीने वितरण करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची आहे.

एखाद्या प्रकल्पावर पाणी वापर हक्कदारी कार्यक्रम राबविण्यासाठी खालील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे :-

i) MMISF Act २००५ च्या कलम-५,६ व ८ अन्वये कार्यक्षेत्र निश्चितीची कार्यवाही झालेल्या (delineation of area ) पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्रात सर्व सभासद पाणी वापर संस्था स्थापन करतील.

ii) पाणी वापर संस्था स्थापन झाल्यानंतर सिंचन प्रणालीची संयुक्त पहाणी MMISF Act २००५ च्या कलम-२२ (१) नुसार झाली पाहिजे. त्यानुसार प्राथम्य-१ व प्राथम्य-२ कामे निश्चित झालेली पाहीजेत.

iii) लघु वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्रातील हस्तांतरणपूर्व व नवीन दुरुस्ती कामांसाठी कंत्राट व्यवस्थापन समिती ( CMC) स्थापन होऊन त्यामध्ये पाणी वापर संस्थेचा सहभाग प्रस्थापित झालेला असला पाहिजे.

iv) MMISF Act २००५ च्या कलम-५२ नुसार पाणी वापर संस्थेकडून व कलम-५३ नुसार सेवा पुरवठादार या नात्याने जलसंपदा विभागाकडून विहित कर्तव्यांचे पालन झाले पाहिजे.

v) MMISF Act २००५ च्या कलम-२३(१) नुसार पाणी वापर संस्थेच्या कार्यक्षेत्राच्या प्रारंभी योग्य रितीने अंशशोधन (calibration) करण्यात आलेली प्रवाहमापके बसवून घेण्याची व्यवस्था झालेली असली पाहिजे.

## ६.० पाणी हक्कदारी कार्यक्रमाची अंमलबजावणी , संनियंत्रण व विनियमन

MMISF Act २००५ नुसार राज्यात पाणी हक्कदारी कार्यक्रमाची अंमलबजावणी व्यवस्थित होण्यासाठी प्रकल्पांसंबंधित क्षेत्रीय अधिकारी, विनियामक व पाणी वापर संस्थांचे सदस्य यांचेवर विशिष्ट जबाबदाऱ्या सोपविलेल्या आहेत. हे सुकर व्हावे म्हणून **(पथदर्शी) पाटबंधारे प्रकल्पातून पाणी वापर हक्कांचे निश्चितीकरण, विनियमन आणि अंमलबजावणी** याचे मार्गदर्शन करणारी तांत्रिक संहिता प्राधिकरणाने जानेवारी २००७ मध्ये प्रकाशित केली. या संहितेमध्ये ११ प्रपत्रे विहित करण्यात आली असून त्यातील काही पाणी वापर संस्थांनी तर काही प्रकल्प अधिकाऱ्यांनी ठेवावयाची आहेत. पाणी वापर संस्थेला दिलेला कोटा त्यांना मिळाला किंवा नाही हे पाहण्यासाठी आवर्तन काळात पाणी वापर संस्था व प्रकल्प अधिकारी यांच्या साक्षीने प्रतिदिनी नोंद ठेवणे विहित केले आहे. त्रयस्थ म्हणून प्राधिकरणाच्या वतीने नियुक्त केल्या जाण-या विनियामकांनी सुध्दा ही बाब तपासून नोंद घेण्याचे निर्देश आहेत.

तांत्रिक संहितेतील प्रपत्रावरुन संस्थेला मंजूर केल्याप्रमाणे कोटा मिळण्याची हमी मिळते. कोटा किती मंजूर आहे व प्रत्यक्ष किती मिळाला, यावरुन घनमापन आकारणी किती होणार याचा अंदाज बांधता येतो. त्यामुळे पुढे उद्‌भणारे वाद टाळण्यास मदत होते. हंगाम सुरु होण्यापूर्वी प्रकल्प अधिकारी प्रत्येक संस्थेला तिचा देय कोटा किती आहे, हे प्रतिवर्षी तिच्याबरोबर बैठक घेऊन सांगतील. देय कोटयाआधारे कोणती पिके घ्यावयाची व किती आवर्तनात पाणी घ्यावयाचे याचे नियोजन संस्थेला करता येते.

पाणी वापर हक्कदारीचे संनियंत्रण व विनियमन करण्यासाठी प्राधिकरणाकडून जलसंपदा विभागातील सहाय्यक अभियंता श्रेणी-१/उप विभागीय अभियंता/उप विभागीय अधिकारी/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता या स्तरावरील अधिकाऱ्यांची विनियामक म्हणून थेट नेमणूक होते. त्रयस्थ भूमिकेतून प्राधिकरणाच्या वतीने प्रत्यक्ष क्षेत्रावर आवर्तन काळात त्यांच्याकडून मोजमापाची पडताळणी, प्रवाहमापकांची तपासणी व विहित केलेल्या प्रपत्रामध्ये शेरा नोंदविणे ( Entitlement Register ) याद्वारे ते आपली भूमिका बजावतात आणि प्राधिकरणास जबाबदार असतात. त्यांच्यासाठी ऑक्टोबर २००७ मध्ये प्राधिकरणाने हक्कदारीच्या संदर्भात विभागाच्या अधिकाऱ्यांची व विनियामकांची कर्तव्ये स्पष्ट करणारी **विनियामकांचे अधिकार व कार्ये आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी** या शीर्षकाची मार्गदर्शक पुस्तिका ऑक्टोबर २००७ मध्ये प्रसृत केली.

पाणी वापर संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना संस्थेचे हिशोब, लेखा, मोजमापे इत्यादीमध्ये प्रशिक्षित करण्यासाठी महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पाच्या अंतर्गत निवडक सेवाभावी संस्थांची सहाय्यकारी (facilitator ) म्हणून योजना केलेली आहे. उपक्रमशील व सक्रीय अशा सेवाभावी संस्थांकडून हे काम चांगल्या प्रकारे होत आहे.

## ७.० बांधकामाधीन प्रकल्पावर पाणी वापर संस्थांची स्थापना

MMISF Act २००५ च्या कलम-७३ नुसार बांधकामाधीन प्रकल्पांवरील सहकारी पाणी वापर संस्था स्थापन करण्याबाबत शासनाने निर्णय क्र. मसिंप १००६/(१००७/२००६)/ सिं.व्य. (धो), दिनांक १७ फेब्रुवारी २००७ नुसार आदेशित केले आहे. त्यानुसार सिंचनाचा लाभ १ ते २ वर्षात ज्या क्षेत्रास मिळेल असे नियोजन आहे अशा क्षेत्रावर संस्था स्थापन करण्याची कृती करुन

MMISF Act २००५ च्या कलम ५, ६, ७ व ८ नुसार कार्यवाही करुन वितरण व्यवस्थेचे व्यवस्थापन संस्थेकडे सोपवावयाचे आहे. या दृष्टीने राज्यात पुणे व अमरावती प्रदेशातील प्रकल्पांवर स्तुत्य प्रयत्न झालेले आहेत. अन्य प्रदेशातही अशी कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

## ८.० लघु वितरिकास्तरीय पाणी वापर संस्थांच्या स्थापनेचे पुढचे पाऊल

काही प्रकल्पांवर प्रकल्पस्तरीय / वितरिकास्तरीय संस्था स्थापन करण्याची कार्यवाही झालेली आहे. उदा. वाघाड (नाशिक), पेनटाकळी (अमरावती), इटियाडोह (नागपूर), मुळा (नाशिक), मांगी (पुणे ), सुखना (औरंगाबाद). कंसातील नांवे प्रादेशिक विभागांची आहेत.

## ९.० "पाणी वापर हक्कदारी" बाबत कार्यशाळांमध्ये सहभागी झालेल्या प्रतिनिधीकडून उपस्थित केलेले सर्वसाधारण मुद्दे

### अ. पाणी वापर संस्थांच्या अडचणी

**१.** पाणी वापर संस्थांना कार्यक्षेत्र हस्तांतरण करण्यापूर्वी कालव्यात पाणी सोडून पुच्छ भागापर्यंत पाणी जात असल्याची खातरजमा होणे आवश्यक आहे. मोजमाप यंत्रणा सुस्थितीत असावी. गेज calibration झालेले असावे.

**२.** कालव्या द्वारे होणारा तसेच जलाशयातून होणारा पाण्याचा उपसा अनियंत्रित आहे. लाभक्षेत्राबाहेर अनियंत्रित उपशाद्वारे पाण्याचा जास्त वापर होत आहे. मुख्य कालव्याला direct outlets आहेत. त्याद्वारे होणाऱ्या पाणी वापरावर नियंत्रण नाही. सदर अनधिकृत वापर थांबविण्यात यावा. तसेच पाणी वापर संस्थेस क्षेत्र हस्तांतरित केल्यानंतर बिगर सिंचनास नव्याने परवाना देऊ नये.

**३.** शेतचाऱ्याबाबत समस्या -

- लाभक्षेत्रातील शेतचाऱ्यांची कामे झालेली नाहीत. शेतचाऱ्यांची दुरुस्ती करुन द्यावी.
- पाटचाऱ्यांची दुरुस्ती करुन देण्यास ग्रामपंचायती अडचणी निर्माण करतात.

- शेतकरी त्यांच्या शेतात शेतचाऱ्या करु देत नाहीत. तरी शासनाकडून मोबदला देण्यात यावा.

४. पा. वा. संस्था सक्षम होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात :-

- अनुदान देऊन लाभक्षेत्रात विहिरी शासनाने करुन द्याव्यात.
- लाभधारक प्रबळ होण्यासाठी त्याला सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे.
- पा. वा. संस्थेस उत्पनाचे साधन नाही, चेअरमनसाठी अनुदान (मानधन देण्यासाठी) मिळावे. सदस्यांना देखील मानधन मिळावे. कामाची जबाबदारी पार पाडावी लागते, परंतु उत्पन्न नाही, असे होता कामा नये.
- संस्थांना क्षेत्र हस्तांतरण झालेले नाही, त्यामुळे पाणी वापर संस्थेस अधिकार नाहीत. संस्था प्रबळ होणेचे दृष्टीने प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.
- शेतकऱ्यांना बी-बियाणे सवलतीच्या दरात उपलब्ध करुन द्यावेत.
- वसुली कमी आहे. अनुदान मिळत नाही. वसुली करण्यासाठी कर्मचारी नाहीत कारण कर्मचाऱ्यांचे पगार संस्था भागवू शकत नाही.
- वसुलीसाठी मोजणी होणे आवश्यक आहे. या साठी प्रशिक्षण देण्यात यावे. सिंचन मोजणी व्यवस्थापनासाठी आर्थिक अनुदान आवश्यक आहे. त्यासाठी पा.वा.संस्थांना निधी देण्यात यावा.
- पूर्वीच्या थकबाकीची वसुली होत नाही. मनुष्यबळ कमी आहे.
- तलावातील पाण्याचे मच्छीमार अधिकार पाणी वापर संस्थांना देण्यात यावेत.
- ठिंबक सिंचन पध्दतीचा वापर वाढविणे आवश्यक आहे. यास्तव पाटपाण्या ऐवजी ठिंबक योजना करुन द्यावी. त्यासाठी अनुदान देण्यात यावे. ठिंबक सारख्या सूक्ष्म सिंचन पध्दतींच्या अंमलबजावणीमध्ये सवलती मिळाव्यात.

- वाहत्या कालव्याच्यायोगे groundwater recharge होत असल्यामुळे अशा प्रकरणी पा.वा.संस्थाना पाणीपट्टी वसुलीचा अधिकार असावा.
- पा.वा.संस्थांचे संकेतस्थळ निर्माण करण्यात यावे. आर्थिक उत्पन्न वाढविणेच्या दृष्टीने वृक्ष लागवड, पर्यटन व अन्य स्वरुपात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक अनुदान अथवा अल्प दरात कर्ज देण्यात यावे.
- पा.वा.संस्थांचा महासंघ शासनाने स्थापन करुन द्यावा.
- प्रदर्शनातून अद्ययावत माहिती मिळते. प्रदर्शनास जाण्यासाठी पावासं सदस्यांना अनुदान द्यावे, त्यासाठी त्यांनी केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळावी.
- लाभक्षेत्रात शेततळी घेण्यास कृषी खात्याचा शासन निर्णय अडचण निर्माण करणारा आहे. त्यात यथायोग्य बदल व्हावा.
- धरणातील गाळ काढून मिळावा. त्या योगे पाणी जास्त उपलब्ध होईल.
- जमीन हस्तांतरण करण्यापूर्वी पा.वा.संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र अनिवार्य करावे. पाणीपट्टी थकित ठेऊन जमिनीची विक्री होते. त्यास पायबंद बसेल.
- रबी हंगामापुरते नियोजन केले जाते. पाणी शिल्लक असल्यास उन्हाळीसाठी पाणी देण्यात यावे.
- पुच्छ भागातील संस्थांना पाणी मिळत नाही. संकल्पित विसर्ग मिळत नाही, पाणी पुच्छ भागापर्यंत पोहचत नाही.
- Middle व tail reach ला पाणी मिळत नाही, शीर्ष भागातील शेतकरी खाली पाणी येऊ देत नाहीत.

## ब. विनियामकांच्या अडचणी

- स्वतःचे क्षेत्रीय काम सांभाळून विनियामक म्हणून काम करणे अवघड होते.
- विनियामकांना अनुषंगिक खर्चाची प्रतिपूर्ती / TA Bills वेळेवर मिळत नाहीत.
- विनियामकांना laptop उपलब्ध करुन देण्यात यावेत.

- विनियामकांना प्राधिकरणाशी थेट पत्रव्यवहार करण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन द्यावी.
- विनियामकांना आवर्तनाच्या वेळी पावासंच्या कायक्षेत्राच्या ठिकाणी (दूरवर असल्यास) तपासणीसाठी जाण्यास वाहनाची सोय होणे आवश्यक आहे.

**क. सिंचन व्यवस्थापनाशी संबंधित अधिका-यांच्या अडचणी**

- Staff कमी आहे. शाखा कार्यालयात पूर्ण staff असावा. अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. शाखा कार्यालयात बीट कर्मचारी नाहीत. बीट प्रमुख नाही. पाणी अर्ज, पाणी पंचनामा, पाणीपट्टी वसुली इत्यादींबाबत अडचणी आहेत.
- कनिष्ठ स्तरावरील अभियंत्यांना काहीही अधिकार नाहीत. वरिष्ठांचा सहभाग असावा तसा नाही.
- शाखा कार्यालयात ब-याच सुविधा नाहीत. सिंचन शाखेला computer उपलब्ध होणे गरजेचे आहे.
- विनियामकांप्रमाणे क्षेत्रीय अधिका-यांना ही प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
- शाखा अभियंता / उप अभियंता यांचे अधिकार वाढविणे आवश्यक आहे.
- जीप वाहतुकीसाठीची इंधन मर्यादा असल्यामुळे काम करणे कठीण जाते. पुरेशा frequency ने पाहणी करण्यास त्यामुळे मर्यादा पडतात.

**ड. प्रदेनिहाय महत्त्वाचे मुद्दे**

**१) विदर्भ**

- शेतक-यांचा विकास सिंचनाच्या विकासावर अवलंबून आहे. विदर्भात काही धरणातील सर्व पाण्याचा उपयोग केला जात नाही.
- Implementation of Hon'ble Governor's Directives ही MWRRA ची जबाबदारी आहे. विदर्भात ५५० अधिका-यांची पदे रिक्त आहेत. त्या भरण्याच्या दृष्टिने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

- विदर्भात पाणी वापर न झाल्यामुळे आंध्र प्रदेशात वैनगंगा खोऱ्यात प्रकल्प बांधले जात आहेत व त्याद्वारे पाणी वापर होत आहे. यास्तव विदर्भातील प्रकल्पांना प्राध्यानाने मान्यता देणे आवश्यक आहे.
- पेन टाकळी प्रकल्पातील वहन व्ययाबाबतच्या प्रस्तावाबाबत आदेश देण्यात यावेत.
- गरज असेल तेव्हा पाणी मिळत नाही. खरीपामध्ये सर्व सभासदांना एकाच वेळी पाणी लागते.
- धान पिकासाठी एकदम पाणी लागते. तशी व्यवस्था व्हावी.
- माजी मालगुजारी तलाव शासनाने ताब्यात घ्यावेत व त्यांची दुरुस्ती व निगराणी नियमितपणे करीत जावी.
- जिल्हा परिषदेचे तलाव पेंच प्रकल्पाच्या पाण्यातून भरुन द्यावेत व पा.वा.संस्थांना हस्तांतरित करावेत.
- जलाशयात ३३% पाणीसाठा असताना वरच्या भागातील शेतक-यांना लाभ होण्याच्या दृष्टीने सिंचनाचे नियोजन करावे. पुच्छ भागापर्यंत पाणी दिले तर व्यय होऊन नीट नियोजन होऊ शकणार नाही.
- कालवा सल्लागार समिती बैठकीस पाणी वापर संस्थांना बोलविण्यात यावे. पुच्छ भागातील पा.वा.संस्थांच्या हक्काचे पाणी त्या त्या संस्थांनाच मिळावे.
- पाणी वापर संस्थांना विश्वासात न घेता आवर्तन कार्यक्रम ठरविण्यात येतो, हे योग्य नाही.

**२) उत्तर महाराष्ट्र प्रदेश**

- उकाई जलाशयाच्या फुगवटयातून पाणी विनावापर वाहून जाते, त्याचा विनियोग होण्याच्या दृष्टिने योजना तयार करावी.
- गिरणा पाट वाघूर नदीला मिळवावा. तसेच इतर जोड प्रकल्पांचे नियोजन करावे.
- हतनूर प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात शेततळी करण्यासाठी योजना राबवावी.

- लघु प्रकल्प व मोठया-मध्यम प्रकल्पांकरिता पाणीपट्टीचे दर सारखे आहेत. लघुप्रकल्पांसाठी कमी दर असावेत.
- पाणलोट क्षेत्रात सिमेंट बंधारे बांधावेत.
- कालव्याकरिता tail ची तरतूद नाही. त्यातील पाणी आजूबाजूच्या शेतात पसरुन tail कडील शेतक-यांचे नुकसान होत आहे. Tail चे पाणी नाल्यात सोडणे आवश्यक आहे.
- Tail Channel शेतातून काढावे लागतील. जमीन मिळणार नाही त्याऐवजी शेततळी करुन देणेची व्यवस्था करावी.
- ठिंबक सिंचनाचा वापर वाढविणे आवश्यक आहे.
- धरणातील गाळ काढून मिळावा, त्या योगे पाणी जास्त उपलब्ध होईल.
- फळबागांमध्ये सुरुवातीच्या काळात आंतर पिके घेण्याबाबत विचार व्हावा.

**३) कोकण**

- पा. वा. संस्थेच्या प्रतिनीधीनी सेवानिवृत्त कृषि / जलसंपदा अधिकाऱ्यांच्या मदतीने पाणीवापर हक्काबाबत ची आकडेमोड तपासून घ्यावी व समजावून घ्यावी.
- अंबोली लघु पाटबंधारे प्रकल्पा अंतर्गत पुरस्कार प्राप्त पा. वा. संस्था आहे. पुर्नस्थापना काम बंद आहे. प्रकल्प मजसुप्र मधून वगळला आहे. पाणीवापर हक्क दिला आहे. त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार कामे पूर्ण करुन हस्तांतरण करुन देणे आवश्यक आहे.
- पाणी वापर संस्थांच्या सचिवांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.
- ठिंबक सिंचनाचा अवलंब करुन सर्व क्षेत्रास पाणी देण्यात यावे. कृषि खात्यामार्फत ठिंबक सिंचन प्रणाली तयार करण्यासाठी अनुदान मिळण्याबाबत प्रयत्न करावा.
- परिरक्षण व दुरुस्ती अनुदान इतर स्त्रोतामधून मिळविण्याचा प्रयत्न करावा. शासनाकडून सिंचन क्षेत्रावर आधारित मिळणारे अनुदान अपुरे आहे.
- जंगली जनावरांचा उपद्रव फार आहे. पिकांचा नाश होतो. यावर उपाययोजना हवी.

- माडखोल ल. पा.योजना मजसुप्र अंतर्गत पाणी वापर हक्कदारी मधील प्रकल्प आहे. पुरहानीमुळे कालवा नादुरुस्त आहे. कामे पूर्ण करुन हस्तांतरण करण्यात यावे.
- वरील बाजूचे लोक गेट उघडतात. सबब खालच्या भागास पाणी मिळत नाही. सामाजिक मुद्दा आहे. सर्वांना पाणी मिळणेचे दृष्टीने एकत्रपणे प्रयोग करावा. ग्रामपंचायत पातळीवर विषय घ्यावा.
- 'पाण्याची शुध्दता' या बाबत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. भविष्य कालीन मागणीच्या तुलनेत पाणाची उपलब्धता मर्यादित आहे.
- श्रमदान इत्यादी माध्यमातून कामे पूर्ण करुन निर्मित सिंचन क्षेत्राचा पूर्णपणे वापर करावा.

**१०. प्राधिकरणातर्फे समस्यांचे / अडचणींचे निराकरण**

पाणी वापर संस्थांच्या समस्या, क्षेत्रीय अधिकाऱ्यांना अंमलबजावणीमध्ये आलेल्या अडचणी आणि विनियामकांना त्यांची कर्तव्ये बजावत असताना येणाऱ्या अडचणी याच्यावर प्राधिकरणातर्फे सदस्य (अभियांत्रिकी) यांनी सर्वसाधारण सूचना केल्या. त्याचबरोबर शासन स्तरावरुन ज्या समस्यांची उकल होणे आवश्यक आहे त्याबाबत केलेली कार्यवाही याचाही परामर्ष घेतला. त्याचा मतीतार्थ खालीलप्रमाणे :-

१) सिंचनासाठी पाणी वाटपामध्ये लाभार्थींचा सहभाग वाढविला जावा तसेच महिलांचा सहभाग असावा. १९९२ मध्ये जागतिक स्तरावर प्रसृत झालेल्या Dublin Principles च्या ४ सूत्रांपैकी एक सूत्र पाणी व सिंचन व्यवस्थापनामध्ये महिलांच्या सहभागाचा पुरस्कार करणारे आहे. त्याचा अंगीकार करण्याचे दायित्व सेवा पुरवठादारांबरोबरच लाभधारकांचे, नियामक संस्थांचे आहे. सर्वांनी पाणी वापर संस्था ही एक सामाजिक चळवळ समजून चालली पाहिजे. ही चळवळ जर निकोपपणे व कार्यक्षमतेने कार्यप्रवण राहिली तर एकंदर सिंचन व्यवस्थापनामध्ये काय परिवर्तन होते याची उदाहरणे म्हणून राज्यातील वाघाड, मांगी, मुळा, मनपाडळे, बेनीक्रे या

सारख्या प्रकल्पांकडे निर्देश करता येईल. या यशस्वी प्रकल्पांचा आदर्श अन्य पाणी वापर संस्थांनी तसेच प्रकल्पांनी ठेवावा व कार्यक्षमतेमध्ये सुधारणा करावी.

२) पाणी वापर संस्था व जलसंपदा विभागाचे अभियंता यांच्यात परस्पर समन्वय असावा. प्रत्येक प्रश्नाकडे सकारात्मक दृष्टीने पहावे. प्राधिकरणाची भूमिका शासन व पाणी वापर संस्था यामधील दुवा आहे.

३) प्राधिकरणाने पाटबंधारे प्रकल्पाच्या परिरक्षण व दुरुस्तीचे मापदंड जुलै २००२ मध्ये निर्धारित केले होते. काळाच्या ओघात त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याने प्राधिकरणाने याबाबत शासनाच्या संबंधित विभागांकडे (जलसंपदा, वित्त) नेटाने पाठपुरावा केला. त्याची परिणती जलसंपदा विभागाच्या दि. २७/८/२०१३ चा शासन निर्णय निर्गमित होण्यात झाली.

४) संस्थांनी सदस्यांकडून वसुल केलेल्या पाणीपट्टीतील काही हिस्सा संस्थांच्या कार्यक्षेत्रातील सिंचन प्रणालीच्या व्यवस्थापनासाठी परतावा म्हणून देण्यात येतो. पाणी वापर संस्थांना आर्थिक स्थैर्य येण्यासाठी जलसंपदा विभागाच्या दि. २२/७/२००६ च्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आलेले यासाठीचे अनुदान अपुरे आहे असे राज्यातील ठोक जलदराचे (२०१०-१३) निर्धारण करताना प्राधिकरणाच्या लक्षात आल्यानंतर जलसंपदा विभागाकडे प्राधिकरणाने प्रस्ताव पाठविला. त्याचा नेटाने पाठपुरावा करुन वित्त विभागालाही त्याची निकड लक्षात आणून दिली. तो शासन निर्णय सुधारित होण्याची कार्यवाही प्रतिक्षीत आहे.

५) सिंचन प्रणालीच्या देखभाल-दुरुस्तीसाठी जलसंपदा विभागाचे शासन परिपत्रक क्र.नूतनीकरण २०१३/प्र.क्र.५७९/सिंव्य (कामे), दि. २४/७/२०१३ मधील निर्देश उपयुक्त आहेत. त्यानुसार जुन्या कालव्यांची / वितरिकांची दुरुस्ती, स्वच्छता, गाळ काढण्याचे काम हा कार्यक्रम मनरेगा (Mahatma Gandhi National Rural Employment Guaranttee Abhiyan) अंतर्गत घेता येईल. त्यामधून जास्तीतजास्त क्षेत्र सिंचनाखाली आणणे शक्य होईल, शेवटच्या भागाला पाणी मिळण्याची हमी देता येईल. सदर कार्यक्रम जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय राखून राबविता येईल.

६) पाणी वापर संस्थांच्या कार्यक्षेत्रातील सिंचन प्रणालीच्या दुरुस्तीमधील तातडीची कामे जलसंपदा विभागाकडून होण्यासाठी प्राधिकरणाकडून विशेष पाठपुरावा केला जातो.

७)	पाणी वापर संस्थांचे पदाधिकारी/सदस्य यांना प्रशिक्षण घेता आले पाहिजे. त्यातून त्यांना नवीन शिकावयास मिळेल. टप्प्याटप्प्याने केलेले प्रयत्न यशस्वी होतात. राज्यात अन्य पाणी संस्थांची झालेली चांगली कामे अशावेळी प्रशिक्षणार्थी लाभार्थ्यांना दाखविल्यास त्यांचा दृष्टीक्षेप बदलतो.

**या व्यतिरिक्त कार्यशाळेमध्ये पाणी वापर संस्थांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात आले :-**

- सेवानिवृत्त शिक्षक / अधिकारी / कर्मचारी यांची पा.वा.संस्थांमध्ये नेमणूक करुन घेतल्यास त्यांचे कडून कमी खर्चात संस्थेची कामे करुन घेणे शक्य होईल.
- पा.वा.संस्थांच्या पदाधिका-यांमध्ये महिलांचा समावेश असावा. महिलांचा सक्रिय सहभाग पा.वा.संस्थांमध्ये आवश्यक आहे.
- लोकवर्गणी, श्रमदान इत्यादींचा अवलंब करुन कालवा व प्रणालीतील गाळ काढण्यात यावा.
- ठिंबक सिंचन अनिवार्य करावे.
- जेथे शक्य असेल तेथे शेततळी असावीत.
- पाणी वापर हक्कांची परिगणना कशी केली हे पा. वा. संस्थेच्या पदाधिका-यांनी समजून घ्यावे व त्यानुसार तपासावे.
- tail-to-head सिंचन पध्दती अवलंबिण्यात यावी.
- पाणी उपलब्धता कमी आहे, पाण्याची गरज वाढती आहे. सबब पाण्याचा कार्यक्षम वापर होणे आवश्यक आहे.
- पाणी कमी असल्याने पीक पध्दतीत वैविध्य आणणे (crop diversification), कमी पाणी लागणारी पिके घेणे इत्यादींचा अवलंब करण्यात यावा.
- ठिबक, तुषार सिंचन या सारख्या दाबयुक्त सिंचन पध्दतींचा अवलंब करण्यात यावा. रबी हंगामामध्ये दोन तसेच उन्हाळी हंगामामध्ये देखील एक पीक घेणे शक्य आहे का हे तपासावे व शक्य असल्यास त्याप्रमाणे करावे.

- रबीतील पाणी वाचवून उन्हाळी हंगामात पाण्याचे नियोजन केल्यास (जानेवारी १५ नंतर) थंडी चा फायदा घेऊन (पिकास पोषक वातावरण) हिताचे राहील. त्या दृष्टीने नियोजन करावे.
- जोडधंदा, मूल्यवर्धित अर्थव्यवस्था / शेतमालाचे मूल्यवर्धन होण्याच्या दृष्टीने बचत गटाच्या सहकार्याने विविध उत्पादने करुन विक्री करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.
- पा. वा. संस्थेने आपुलकीने कामे करणे आवश्यक आहे. तिच्या सभासदांमध्ये जागरुकता आवश्यक आहे. सिंचनक्षेत्र वाढविणे व त्या योगे वसुली वाढविणे यासाठी संस्था प्रयत्नशील असाव्यात.
- पाणी प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी सर्वस्तरावर जागरुकता हवी.
- पाण्याची शुध्दता वाढविण्याकडे प्राथम्याने लक्ष द्यावे.
- पर्यावरणाला उपसर्ग न पोहोचविता पुढील पिढयांना देखील वापर करता येईल ह्या दृष्टिने काटकसरीने पाण्याचा वापर करावा.
- पाणी ही संपत्ती असून तिचा योग्य विनियोग होणे आवश्यक आहे. नियोजनात भूजलाचा विचार होणे आवश्यक आहे.

---ooo---